NATIONAL HEALTH MISSION
राष्ट्रीय स्वास्थ्य मिशन

सत्यमेव जयते
Ministry of Health & Family Welfare
Government of India

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

# न्यूमोनिया/गंभीर जंतूसंसर्ग असलेल्या नवजात अर्भकांमधील (० ते २ महिने) समुदाय आणि बाह्य रुग्ण स्तरावर उपाययोजना

## फ्लो चार्ट

### टप्पा १: मूल्यमापन

- मातेचे दूध ओढता न येणे किंवा
- आकडी येणे किंवा
- श्वासोच्छवास वेगाने होणे (दर मिनिटाला ६० किंवा त्याहून अधिक वेळा श्वासोच्छवास घेणे) किंवा
- छाती अधिक खोलवर आत ओढली जाणे किंवा
- ॲक्सिलरी (काखेतील) तापमान ३७.५° सेल्सियसपेक्षा अधिक असणे (किंवा अंग गरम लागणे) किंवा
- ॲक्सिलरी (काखेतील) तापमान ३६.५° सेल्सियसपेक्षा कमी असणे (किंवा अंग थंड लागणे) किंवा
- उत्तेजना दिल्यावरच हालचाल होणे किंवा हालचाल अजिबात न होणे.

### टप्पा २: वर्गीकरण

- जर एक किंवा त्याहून अधिक लक्षणे दिसून आली तर : गंभीर जंतूसंसर्ग (पीएसबीआय) असे वर्गीकरण करणे.

### टप्पा ३: रुग्णालयात संदर्भित करण्यापूर्वीची मात्रा आणि संदर्भित करणे

**आशा (घरच्या घरी)**

१. रुग्णालयामध्ये तातडीने संदर्भित करण्यासाठी माता / काळजीवाहकांचे समुपदेशन करा.
२. जेएसएसके योजनेच्या आधारे वाहतुकीच्या साधनाची व्यवस्था करा.
३. संदर्भित करण्यापूर्वी ॲमॉक्सिसिलीनची मात्रा मुखावाटे द्या.

**एएनएम**

१. संदर्भित करण्यापूर्वी जेंटामायसिनचे इंजेक्शन आणि ॲमॉक्सिसिलीनची मात्रा मुखावाटे द्या.
२. रुग्णालयामध्ये तातडीने संदर्भित करण्यासाठी माता / काळजीवाहकांचे समुपदेशन करा. ( एएनएमद्वारे : नजिकच्या आरोग्य संस्थेमध्ये).
३. जेएसएसके योजनेच्या आधारे वाहतुकीच्या साधनाची व्यवस्था करा.
४. उपचाराचे कार्ड भरा आणि त्याची पावती रुग्णालयात दाखल करून घेऊन प्रमाणित उपचार देण्यासाठी सुसज्ज असलेल्या आरोग्य संस्थेत घेऊन जाण्यासाठी माता / काळजीवाहकाला द्या.

**आरोग्य संस्थेला संदर्भित करणे.**

| अर्भकाचे वजन | स्नायूवाटे देण्याच्या जेंटामायसिनच्या इंजेक्शनची मात्रा (कुपी * २ मि.ली. मध्ये ८० मि.ग्रॅ. असते) | सिरपच्या स्वरुपात ** मुखावाटे देण्याच्या ॲमॉक्सिसिलीनची मात्रा (१२५ मि.ग्रॅ. प्रति ५ मि.ली.) | विरघळणाऱ्या गोळीच्या स्वरुपात मुखावाटे देण्याच्या ॲमॉक्सिसिलीनची मात्रा (२५० मि.ग्रॅ.) |
|---|---|---|---|
| | ५ मि.ग्रॅ./प्रति कि.ग्रॅ./ मात्रा*दिवसातून एकदा | २५ मि.ग्रॅ./प्रति कि.ग्रॅ./मात्रा** दिवसातून दोन वेळा | |
| १.५ कि.ग्रॅ.पेक्षा कमी | अधिक सुविधा असलेल्या आरोग्य सुविधाकेंद्रात संदर्भित करणे | | |
| १.५ कि.ग्रॅ.पेक्षा अधिक - २.० कि.ग्रॅ.पर्यंत | ०.२ मि.ली. | २ मि.ली. | १/४ |
| २.० कि.ग्रॅ.पेक्षा अधिक - ३.० कि.ग्रॅ.पर्यंत | ०.३ मि.ली. | २.५ मि.ली. | १/२ |
| ३.० कि.ग्रॅ.पेक्षा अधिक - ४.० कि.ग्रॅ.पर्यंत | ०.४ मि.ली. | ३ मि.ली. | १/२ |
| ४.० कि.ग्रॅ.पेक्षा अधिक - ५.० कि.ग्रॅ.पर्यंत | ०.५ मि.ली. | ४ मि.ली. | १/२ |

### टप्पा ४: संदर्भित करणे शक्य नसल्यास व्यवस्थापन करणे

जर रुग्णालयात दाखल करणे / संदर्भित करणे नाकारले किंवा शक्य नसेल तर वैद्यकीय अधिकारी/एएनएमने जेंटामायसिनचे इंजेक्शन आणि ॲमॉक्सिसिलीनची मात्रा मुखावाटे देण्यास प्रारंभ करावा.

१. एएनएमने आरोग्य संस्थेतील वैद्यकीय अधिकारी/परिचारिकेला नवजात अर्भकाच्या स्थितीची आणि उपचाराची माहिती द्यावी.
२. घरच्या घरी एकूण ७ दिवस ॲमॉक्सिसिलीनची मात्रा मुखावाटे कशी द्यायची याचे प्रशिक्षण मातेला द्या.
३. नवजात अर्भकाला ऊबदार वातावरणात कसे ठेवायचे आणि त्याला वारंवार स्तनपान कसे द्यायचे याचा सल्ला मातेला द्या.
४. उपचाराचे कार्ड भरा.
५. संबंधित एएनएम/आशा यांना नवजात अर्भकाची स्थिती व उपचार तसेच पाठपुराव्याचे नियोजन यांची माहिती द्या.

### टप्पा ५ : पाठपुरावा

**एएनएम (प्रा.आ.कें. / एचएससी / आरोग्य व स्तर)**

१. एकूण ७ सात दिवस जेंटामायसिनची इंजेक्शन आणि ॲमॉक्सिसिलीनची मात्रा मुखावाटे दिली जाईल हे सुनिश्चित करा.
२. जर अर्भक आरोग्य संस्थेत जाऊ शकत नसेल तर एएनएमने अर्भकाच्या घरी जाऊन त्याला / तिला जेंटामायसिनचे इंजेक्शन द्यावे.
३. अर्भकाची स्थिती तसेच धोक्याची लक्षणे दिसत आहेत का हे पाहावे.
४. एएनएमने नजिकच्या आरोग्य संस्थेतील वैद्यकीय अधिकारी / परिचारिकेला अर्भकाच्या प्रकृतीची माहिती द्यावी.
५. जर अर्भकाची प्रकृती बिघडली किंवा उपचार सुरू केल्यावर २४ ते ४८ तासांत प्रकृतीत कोणतीही सुधारणा झाली नाही तर जेएसएसके योजनेच्या आधारे जेथे प्रमाणित उपचार उपलब्ध आहेत अशा आरोग्य संस्थेत त्वरीत संदर्भित करा.

*** पॉसिबल सिरियस बॅक्टेरिअल इन्फेक्शन.**

**** जर उपचार पुढे चालू ठेवायचे असतील तर त्याच कुपीचा ७ दिवसांसाठी पुनर्वापर करता येऊ शकतो. मात्र त्यासाठी ती कुपी थंड, कोरड्या आणि अंधाऱ्या ठिकाणी योग्यरीत्या ठेवलेली असली पाहिजे आणि तसेच त्यातील औषधाचा रंग बदललेला नसला पाहिजे किंवा ते गढूळ झालेले नसले पाहिजे. जर कुपीतील औषधाबाबत काही शंका असेल तर नवी कुपी वापरावी.**

***** घरच्या घरी ॲमॉक्सिसिलीनची मात्रा कशी द्यायची याचे प्रशिक्षण मातेला द्या.**

SAANS
साँस
निमोनिया नहीं, तो बचपन सही

Paste in OPD